(1)

(सोबत उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा ''राज्यातील महाविद्यालये व शैक्षणिक संस्थांमध्ये स्त्री—पुरूष समानतेची बीजे रूजविण्यासाठी ''जागर जाणीवांचा'' अभियांनातर्गत पारितोषिक...'' या विषयाचा शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१२/प्र.क्र.२९६/१२/विशि—१, दिनांक २३.१०.२०१२ ची प्रत सोबत जोडण्यांत येत आहे)

---

क्रमांक : तंशिसं/प्राकाना/शैवि—३/२०१२/5425
सहसंचालक यांचे कार्यालय,
तंत्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय,
शासकीय तंत्रनिकेतन परिसर,सदर, नागपूर.

दिनांक : 27 NOV 2012

प्रति,

संचालक/प्राचार्य

____________________

____________________

____________________

(सर्व पदवी, पदविका तसेच पदव्युत्तर पदवी संस्था)
यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीकरीता.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक
तंत्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय,
नागपूर.

राज्यातील महाविद्यालये व शैक्षणिक संस्थामध्ये स्त्री-पुरुष समानतेची बीजे रुजविण्यासाठी "जागर जाणीवांचा" अभियांनातंर्गत पारितोषिक ......

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक संकिर्ण २०१२/प्र.क्र. २९६/१२ /विशि-१
मंत्रालय, मुंबई -३२.
दिनांक : २३ ऑक्टोबर,२०१२.

**प्रस्तावना** : प्रत्येक नागरिकाने आत्मसन्मान, आत्मविश्वास आणि निर्भयतेने स्वत:च्या व्यक्तीमत्त्वाचा विकास करणे, देशाच्या प्रगतीसाठी अत्यंत आवश्यक आहे. शिक्षणाचे हेच खरे उद्दिष्ट आहे. आजच्या सामाजिक वातावरणात स्त्रिया व मुलींना अशा प्रकारची संधी पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नाही. ही वस्तुस्थिती आहे. ही परिस्थिती बदलून स्त्रिया व मुलींना संपूर्ण आत्मविश्वासाने जगण्याची संधी मिळेल त्याचवेळी आपला देश ख-या अर्थाने सुसंस्कृत व सुशिक्षित मानला जाईल आणि जगभरात एक पुरोगामी राष्ट्र म्हणून ओळखला जाईल. असे वातावरण निर्माण करण्याचे आणि सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याचे महत्त्वाचे माध्यम म्हणजे उच्च शिक्षण आणि ते पुरविणा-या संस्था हे आहेत.

देशाच्या व राज्याच्या सुरक्षित व उज्वल भविष्यासाठी त्या देशाच्या पुढील पिढीचा सर्वांगिण विकास होणे अत्यावश्यक आहे आणि त्यासाठी पोषक व उपयुक्त वातावरण निर्माण करणे, ही शासनाची जबाबदारी आहे. समाजाचा ५० टक्के भाग हा महिला व मुलींनी व्यापालेला आहे. दुदैवाने हा घटक समाजामध्ये समानता व समान अधिकारांपासून वंचित आहे. महाराष्ट्र हे ऐतिहासिक काळापासून महिलांना समानतेची वागणुक देणे व त्यांना शिक्षणाची समान संधी उपलब्ध करुन देण्यामध्ये अग्रेसर आहे. स्वातंत्र्यानंतर राज्य शासनाने या दिशेने ब-याच प्रमाणात ठोस पावले उचलेली आहेत. विशेषत: मुलींच्या उच्च शिक्षणासाठी विविध उपक्रम राबविलेले आहेत.

शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, अशी ठोस पावले उचलून सुध्दा मुली अपेक्षित संख्येने उच्च शिक्षणाचा लाभ घेत नाहीत. परिणामी त्या सामाजिक व आर्थिक विकास जे प्रत्येक नागरीकाचे मुलभूत अधिकार आहेत, त्यापासून वंचित राहत आहेत.

मुलींच्या व त्यांच्या पालकांच्या उच्च शिक्षणाच्या अनिच्छेचे प्रमुख कारण म्हणजे शैक्षणिक संस्थांमध्ये स्त्रीयांना आवश्यक त्या सुरक्षित वातावरणाचा आभाव , स्त्री पुरुष

पत्र प्राप्त झाले
2 NOV 2012
आवक लिपिक
तंत्र शिक्षण संचालनालय
३, महापालिका मार्ग, मुंबई १.

D:\Jagar Janivancha.doc

समानतेच्या वागणुकीचा अभाव परिणामी मुलींच्या मनात निर्माण होणारे भय व त्याचे व्यक्तीत्वावर होणारा प्रतिकुल परिणाम इत्यादी असल्याचे प्रकर्षाने दिसून आले आहे.

जर युवा पिढीच्या मनात स्त्री-पुरुष समानतेचे बीज रुजवायचे असेल आणि मुलींनी निर्भय होऊन, उच्च शिक्षणाचा लाभ घ्यावयाचा असेल तर समाजाचा दृष्टिकोन बदलणे अपरिहार्य आहे. महाविद्यालयांमध्ये या विषयाची जाणीव निर्माण करण्यासाठी स्त्री-पुरुष समानतेविषयी समाजाला जागृत करण्यासाठी व आणि त्यांना याबाबत ठोस पाऊले उचलण्यास प्रोत्साहित करण्यासाठी राज्य शासनाने "जागर जाणिवांचा" हा उपक्रम हाती घेण्याचा निर्णय घेतला आहे. या उपक्रमामध्ये शासनाच्या प्रयत्नाबरोबरच महाविद्यालयांचा सहभाग, विद्यार्थ्यांची कल्पकता व प्रेरक शक्तीचा वापर करणे हे या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे. "जागर जाणिवांचा" हे अभियान समाजाच्या अत्यंत ज्वलंत सामाजिक प्रश्नाला हाताळणारा उपक्रम आहे. तसेच पुढच्या पिढीमध्ये आत्मविश्वास व सुसंवाद निर्माण करण्यासाठी एकंदरीतच सामाजिक विकासासाठी अत्यंत उपयुक्त आहे. राज्यातील प्रत्येक महाविद्यालयाने या उपक्रमात सहभागी होणे, त्यांचे सामाजिक कर्तव्य आहे. त्यामुळे या उपक्रमामध्ये राज्यातील सर्व महाविद्यालयांनी व शैक्षणिक संस्थानी सहभागी होणे अनिवार्य आहे.

३. महाराष्ट्र हे पुरोगामी विचारांचे राज्य असून २१ व्या शतकात समानतेचा जागर होणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे उच्च शिक्षणामध्ये मुलींचे प्रमाण वाढविण्यासाठी स्त्री-पुरुष समानतेमध्ये येणार अडथळे दुर करण्यासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी, महाविद्यालयाचे प्रशासन आणि शिक्षकवृंद यांच्या सहभागाने, स्पर्धा व पारितोषिकाच्या स्वरुपात नाविन्यपूर्ण योजना राबविण्याची शासनास आवश्यकता वाटते. त्यामुळे "जागर जाणिवांचा" या अभियानाच्या माध्यमातून महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी-विद्यार्थीनी, शिक्षक आणि महाविद्यालय प्रशासन इत्यादींना त्यांचे महत्व पटवून त्यांनी सक्रिय व सातत्यपूर्ण सहभाग घ्यावा या दृष्टिकोनातून जिल्हा, विद्यापीठ व राज्यस्तरावर महाविद्यालयांची स्पर्धा घेवून त्यांना **पारितोषीक** देण्याचा उपक्रम सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय

४. प्रस्तावनेमध्ये नमूद केलेली पार्श्वभूमी विचारात घेऊन शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

(१) सदर शासन निर्णयानुसार राबविण्यात येणा-या "जागर जाणीवांचा" या अभियानांतर्गत मार्गदर्शक तत्वे सोबत जोडलेल्या **"परिशिष्ट-अ"** मध्ये दर्शविल्याप्रमाणे राहतील.

(4)

(२) स्पर्धा कोणत्या स्तरावर, कोणत्या कालावधीत घेण्यात येतील याबाबतचा तपशील, सोबत जोडलेल्या "**परिशिष्ट-अ**" मध्ये दर्शविल्याप्रमाणे राहतील.
(३) प्रत्येक महाविद्यालयाने त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या सूचनांपैकी फक्त ५ उत्कृष्ट सुचनां स्पर्धसाठी पाठविण्यात याव्यात. त्यापेक्षा जास्त प्राप्त झालेल्या सूचनांचे मुल्यमापन करण्यात येणार नाही यांची सर्व महाविद्यालयांनी दक्षता घ्यावी.
(४) स्पर्धेचे निकष आणि त्यासाठी विहीत करण्यात आलेल्या बाबी, गुणांकनाची पध्दत **सोबत जोडलेल्या परीशिष्ट-अ** प्रमाणे राहील. त्या अनुषंगाने प्रत्येक महाविद्यालयाने या संदर्भातील परिणामकारक कार्यवाही करावी. संबंधीत महाविद्यालयांनी केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने "**परीशिष्ट-अ**" मधील विहीत बाबींना गुण देऊन सर्वोत्कृष्ट महाविद्यालयांची निवड करण्यात येईल.
(५) सदर स्पर्धेच्या निवड समित्यांची संररचना सोबत जोडलेल्या "**परिशिष्ट-ब**" मध्ये दर्शविल्याप्रमाणे राहतील.
(६) "जागर जाणीवांचा" या अभियानाअंतर्गत सहभागी होणा-या महाविद्यालयामधून सर्वोत्कृष्ट कार्य करणा-या महाविद्यालयांना सोबत जोडलेल्या "**परीशिष्ट-ब**" मध्ये दर्शविल्याप्रमाणे पारितोषिक देण्यात येतील.

५. सदर योजना प्रायोगिक तत्वावर सन २०१२-१३ व २०१३-१४ या शैक्षणिक वर्षासाठी राबविण्यास मंजूरी देण्यात येत आहे. त्यानंतर या योजनेची उपलब्धी विचारात घेऊन योजना पुढे सुरु ठेवण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.
६. सदर योजनेसाठी रुपये १.५० कोटी (रुपये एक कोटी पन्नास लक्ष फक्त) एवढी रक्कम सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाकरीता मंजुर करण्यात येत आहे
७. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.५९२/व्यय-५,दि. १२.१०.२०१२ अन्वये त्यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.
८ हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक क्रमांक २०१२१०२३१२०२४८०७०८ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(विकास तु. कदम)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१ मा.राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, मलबार हील, मुंबई
२ प्रधान सचिव, महिला व बाल विकास, मंत्रालय, मुंबई

D:\Jagar Janivancha.doc

३ सर्व विभागीय आयुक्त
४ सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलगुरु
५ सर्व पोलीस आयुक्त
६ सर्व जिल्हाधिकारी
७ संचालक, उच्च शिक्षण , महाराष्ट्र राज्य, पुणे
८ संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
९ आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे
१० सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
११ सर्व पोलीस अधिक्षक
१२ सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलसचिव
१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता )-१ महाराष्ट्र , मुंबई (५ प्रती)
१४ महालेखापाल (लेखापरीक्षा) -१, महाराष्ट्र मुंबई (५ प्रती )
१५ महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता )-२ महाराष्ट्र , नागपूर (५ प्रती)
१६ महालेखापाल (लेखापरीक्षा) -२, महाराष्ट्र नागपूर (५ प्रती )
१७ संचालक, व लेखा व कोषागारे , (५ प्रती)
१८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१९. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२०. संचालक, राज्य अभिलेख देखभाल अभिकरण अधिकारी
२१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण /तंत्रशिक्षण
२२. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव
२३ मा. मंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव
२४ मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव
२५. सर्व सहसचिव / उपसचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
२६. निवड नस्ती (विशि - १).

## परिशिष्ट-अ

**I) "जागर जाणीवांचा" या अभियानांर्तगत स्पर्धेसाठी आवश्यक बाबी व निकष :-**

"जागर जाणीवांचा" अभियानांतर्गत घेण्यात येणा-या स्पर्धेकरिता प्रत्येक महाविद्यालयाच्या तपासणीसाठी विचारात घ्यावयाच्या बाबी व गुणांचा तपशिल खालील प्रमाणे आहेत :-

| | प्रमुख बाबी | गुण |
|---|---|---|
| (अ) | (१)विद्यार्थ्यांच्या सहभागातून प्राप्त झालेल्या सूचना व त्या सूचना देतांना विद्यार्थ्यांनी हाताळलेली कार्यपध्दती | ५० |
| | (२) विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या सूचनांपैकी महाविद्यालयाने किती सूचना स्विकृत करुन, त्याची अमंलबजाणी केली आहे. | |
| (ब) | शैक्षणिक संस्थेच्यामार्फत पुरविण्यात येणा-या सुविधा व इतर उपक्रम | ५० |
| | एकूण | १०० |

II) सदर अभियानांतर्गत महाविद्यालयाचे मुल्यमापन करण्यासाठी पुढील निकष विचारात घेण्यात यावेत.

**(अ(१) विद्यार्थ्यांच्या सहभागातून प्राप्त झालेल्या सूचना व त्या सूचनांसाठी विद्यार्थ्यांनी हाताळलेली कार्यपध्दती** — ५०गुण

| | | गुण |
|---|---|---|
| (iv) | A) स्त्री - पुरुष समतुल्यता टिकवीण्यासाठी व समाजातील स्त्रियांच्या असलेल्या दुय्यम स्थानामध्ये बदल घडविण्यासाठी केलेली सूचना. | १० |
| | B) महाविद्यालयात होणा-या छेडछाडीमुळे मुलींच्या मनात असलेली भिती व असुरक्षिततेची भावना याला आळा बसावा म्हणुन केलेली सूचना | १० |
| (v) | सदर सूचनांसाठी विद्यार्थ्यांनी हाताळलेली कार्यपध्दती | १० |
| (२)(i) | विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या सूचनांपैकी महाविद्यालयाने किती सूचना स्विकृत करुन, त्याची अमंलबजाणी केली आहे | १० |
| (vi) | विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या सूचनां अमंलात आणण्याची कार्यपध्दती / माध्यम | १० |

(ब) शैक्षणिक संस्थेच्यामार्फत पुरविण्यात येणा-या सुविधा व इतर उपक्रम ५०

(१) विद्यार्थ्यांमध्ये होणारी छेडछाड /चिडविणे /रॅगिंग इत्यादी संदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारीबाबत महाविद्यालयाकडून कोणत्या पध्दतीने तक्रार निवारण करण्यात येते. या संदर्भात विद्यार्थी / कर्मचारी वर्ग यांचे समुपदेशन करण्याची कोणती व्यवस्था महाविद्यालयामध्ये करण्यात आलेली आहे. ०८

(२) शैक्षणिक संस्थेच्यामार्फत विद्यार्थीनी व महिला कर्मचा-यांना पुरविण्यात येणा-या इतर विविध सोयी सुविधा ०५

(३) विद्यार्थीनींचा सर्वांगीण विकास आणि सुरक्षिततेसाठी महाविद्यालयाने उचलेली विविध पावले ( उदा. विशाखा समितीची अमंलबजावणी, महिला विश्राम गृह, महिला स्वच्छतागृहांची उपलब्धता आणि स्वच्छता व वार्षिक आरोग्य तपासणी) ०७

(४) महाविद्यालयापासून दूर रहाणा-या विदयार्थ्यांसाठी महाविद्यालयात ये-जा करण्यासाठी वाहतुकीची करण्यात आलेली व्यवस्था करणे इ. ०२

(५) महाविद्यालयाने त्यांच्या परिसरातील मुलींना व त्यांच्या पालकांना उच्च शिक्षणाचे महत्त्व पटवुन देण्यासाठी शिक्षण संस्थेने केलेले प्रयत्न. ०८

(६) विद्यार्थीच्या मुल्य शिक्षण, जीवन कौशल्य विकास करणे व संवाद कौशल्य, नवीन तंत्रज्ञान आर्थिकदृष्ट्या निर्भर होण्याकरीता प्रेरित करण्यासाठी महाविद्यालयाकडून कोणते कार्यक्रम राबविण्यात येतात. ०५

(७) विद्यार्थ्यांना कोणत्याही सामाजिक व व्यवसायिक प्रसंगांना आत्मविश्वासाने सामोरे जाता यावे, यासाठी कोणत्या प्रकारची पावले उचलत आहे. ०५

(८) महाविद्यालयाच्या प्रशासन व अनुशासनामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग / प्रतिनिधी घेतले जातात काय, असल्यास त्यामधील मुलींचा सहभाग ०५

वाढविण्यासाठी महाविद्यालयाने केलेल प्रयत्न

(९) विद्यार्थीनीना क्रिडा, सांस्कृतिक व इतर शिक्षणेत्तर (अभ्यासाच्याशिवाय) कार्यक्रमांमध्ये समान संधी उपलब्ध करुन देण्यासाठी महाविद्यालयाने केलेले प्रयत्न . ०५

**III) सदर अभियांनाच्या अनुषंगाने आयोजित करावयाच्या स्पर्धा व पारितोषिकासाठी निवड करावयाच्या कालावधीचा तपशिल**

(१) प्रत्येक महाविद्यालयांने **माहे डिसेंबरमध्ये** संबंधित महाविद्यालयात आवश्यकत्या स्पर्धाचे आयोजन करावे.

(२) **माहे जानेवारीच्या पहिल्या आठवडयात** महाविद्यालयांनी वरील (अ) आणि (ब) येथील बाबींची माहिती जिल्हा स्तरावरील निवड समितीच्या अध्यक्षास सादर करावी.

(३) **माहे जानेवारीच्या तिस-या आठवडयात** जिल्हास्तरावरील निवड समितीने त्यांच्या स्तरावरील निवड प्रकिया पूर्ण करावी व जिल्हयामधून सर्वोत्कृष्ट ठरलेल्या महाविद्यालयांचे नाव विद्यापीठस्तरावरील निवड समितीकडे सर्व माहितीसह त्वरीत पाठवावे.

(४) **माहे फेब्रुवारीच्या पहिल्या पंधरवाडयात** विद्यापीठस्तरावरील निवड समितीने त्यांच्या स्तरावरील निवड प्रकिया पूर्ण करावी व विद्यापीठस्तरावरुन सर्वोत्कृष्ट ठरलेल्या महाविद्यालयांचे नाव **माहे फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवडयात** राज्यस्तरावरील निवड समितीकडे सर्व माहितीसह त्वरीत पाठवावे.

(५) **दिनांक ५ मार्च पुर्वी** राज्यस्तरावरील निवड समितीने, त्यांच्या स्तरावरील निवडप्रक्रिया पुर्ण करावी

(६) <u>पारितोषिकाची घोषणा व वितरण दिनांक ८ मार्च रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त</u> राज्यस्तरावरील पारितोषिक विजेत्यासह सर्व जिल्हा, विद्यापीठस्तरावरील पारितोषिक विजेत्या महाविद्यालयांच्या नांवाची घोषणा करुन पारितोषिक वितरण सोहळा साजरा करण्यात यावा.

************

परिशिष्ट-ब

१. "जागर जाणीवांचा" या अभियानांतर्गत घेण्यात येणाऱ्या स्पर्धेसाठी जिल्हा / विद्यापीठ / राज्यस्तरावरील निवड समित्याची संरचना पुढील प्रमाणे राहील :

(१) जिल्हा स्तरावरील निवड समितीची संरचना

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हाधिकारी | - | अध्यक्ष |
| २) जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी | - | सदस्य |
| ३) पोलीस अधिक्षक | - | सदस्य |
| ४) पोलीस आयुक्तांनी नामनिर्देशित केलेला पोलीस उपायुक्तापेक्षा कमी दर्जाचा नसलेला अधिकारी ( फक्त ज्या जिल्हयाच्या ठिकाणी पोलीस आयुक्तालय कार्यरत असेल त्या जिल्हयासाठी) | - | सदस्य |
| ५) विभागीय सहसंचालक | - | सदस्य सचिव |

(२) विद्यापीठ स्तरावरील निवड समितीची संरचना

| | | |
|---|---|---|
| १) कुलगुरु | - | अध्यक्ष |
| २) संचालक, उच्च शिक्षण | - | सदस्य |
| ३) विभागीय आयुक्त यांनी नामनिर्देशित केलेला अतिरिक्त विभागीय आयुक्तापेक्षा कमी दर्जाचा नसलेला अधिकारी | - | सदस्य |
| ४) आयुक्त, महिला व बाल विकास यांनी नामनिर्देशित केलेला प्रतिनिधी | - | सदस्य |
| ५) संचालक, उच्च शिक्षण यांनी नामनिर्देशित केलेली संबंधीत विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील महिला प्राचार्या | - | सदस्य |
| ६) कुलसचिव | - | सदस्य सचिव |

३) राज्य स्तरावरील निवड समितीची संरचना

| | | |
|---|---|---|
| १) मा. मंत्री (उ.व.तं.शि) | | |
| २) मा. राज्यमंत्री (उ.व.तं.शि) | - | अध्यक्ष |
| ३) प्रधान सचिव (उ.व.तं.शि) | - | उपाध्यक्ष |
| ४) प्रधान सचिव (महिला व बाल विकास) | - | सदस्य |
| ५) संचालक, उच्च शिक्षण | - | सदस्य |
| ६) संचालक, तंत्रशिक्षण | - | सदस्य |
| ७) आयुक्त, महिला व बाल विकास | - | सदस्य |
| ८) सहसचिव / उप सचिव, (विशि) उ.व.तं.शि. वि | - | सदस्य |
| | - | सदस्य सचिव |

२. <u>पारितोषिक रक्कमेचा तपशिल :-</u>

(i) जिल्हा स्तरावरील स्पर्धेसाठी पहिले पारितोषिक रु. १ लक्ष व दुसरे पारितोषिक रुपये ५० हजार,

(ii) विद्यापीठ स्तरावरील स्पर्धेसाठी पहिले पारितोषिक रु. २ लक्ष व दुसरे पारितोषिक रुपये १ लक्ष,

(iii) राज्यस्तरावरील स्पर्धेसाठी पहिले पारितोषिक रु. ५ लक्ष व दुसरे पारितोषिक रुपये ३ लक्ष तीसरे पारितोषीक २ लक्ष.

*********